दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | बुधवार, 10 जून 2026 |
अंक क्र. 37 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# सराफा बाजारात मोठी उलथापालथ!

## सोने 4,300 रुपयांनी तर चांदी 10 हजारांनी घसरली

■ मुंबई (वृत्तसंस्था)

सोन्या-चांदीच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत असतानाच आज सराफा बाजारातून दिलासादायक बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज पासून ते देशातील प्रमुख सराफा बाजारांपर्यंत सर्वत्र सोन्या-चांदीच्या किंमतींमध्ये मोठी पडझड पाहायला मिळाली. गेल्या काही दिवसांपासून पश्चिम आशियातील तणाव, कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. त्याचा थेट परिणाम मौल्यवान धातूंच्या बाजारावर दिसून आला आहे. आजच्या व्यवहारात सोने आणि चांदीच्या किंमतींमध्ये मोठी घसरण झाल्याने ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

5 ऑगस्ट डिलिव्हरीच्या सोन्याच्या वायद्यांमध्ये मोठी घसरण दिसून आली. मागील सत्रात प्रति 10 ग्रॅम 1,52,443 रुपयांवर बंद झालेल्या सोन्याचा भाव बाजार उघडताच 1,49,926 रुपयांपर्यंत खाली आला. सुरुवातीच्या व्यवहारातच सोन्याने जवळपास 2,943 रुपयांची घसरण नोंदवली. त्यानंतरही घसरण कायम राहिल्याने सोने 1,49,500 रुपयांच्या आसपास व्यवहार करत असल्याचे दिसून आले. चांदीच्या बाजारात तर आणखी मोठी पडझड पाहायला मिळाली. MCX वर चांदीच्या दरात तब्बल 5 हजार रुपयांची घसरण



झाली. याशिवाय प्रत्यक्ष सराफा बाजारात चांदीच्या किंमतीत जवळपास 10 हजार रुपयांची घसरण झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे चांदीचा दर प्रति किलो 2.50 लाख रुपयांपर्यंत खाली आला आहे. सराफा बाजारातील ताज्या आकडेवारीनुसार, 24 कॅरेट शुद्ध सोन्याच्या दरात 4,300 रुपयांची घसरण झाली असून ते प्रति 10 ग्रॅम 1,48,860 रुपयांवर आले आहे. दागिन्यांसाठी सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या 22 कॅरेट सोन्याच्या किमतीत 3,950 रुपयांची घसरण झाली असून त्याचा दर 1,36,450 रुपये प्रति 10 ग्रॅम झाला आहे. तर 18 कॅरेट सोन्याच्या दरात 3,230 रुपयांची घट होऊन ते 1,11,640 रुपयांवर आले आहे. भाईंदरमध्ये खळबळ! खारफुटीत सापडलेल्या जळालेल्या मृतदेहाच्या प्रकरणाचा उलगडा, तीन सख्खे भाऊ अटकेत

तज्ज्ञांच्या मते, अमेरिकन डॉलरची वाढती ताकद, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर धोरणाबाबत बदलणाऱ्या अपेक्षा आणि जागतिक बाजारातील अनिश्चितता यामुळे सोन्या-चांदीवर दबाव निर्माण झाला आहे. तसेच गुंतवणूकदारांकडून नफा वसुली सुरू झाल्यानेही किंमतींमध्ये घसरण झाली आहे.

दरम्यान, लग्नसराईचा हंगाम आणि सणासुदीच्या खरेदीपूर्वी झालेली ही घसरण ग्राहकांसाठी दिलासादायक मानली जात आहे. अनेकांनी सोन्या-चांदीच्या खरेदीसाठी बाजाराकडे पुन्हा मोर्चा वळवला आहे. मात्र तज्ज्ञांनी गुंतवणूकदारांना सावध राहण्याचा सल्ला दिला असून जागतिक परिस्थिती लक्षात घेता पुढील काही दिवस बाजारात चढ-उतार कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

## तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईचे परळीतून स्वागत उत्तमदादा माने यांचा पाठिंबा

### अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यासाठी सर्व समाजाने एकत्र येण्याची गरज

■ परळी | प्रतिनिधी

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्यभर धडक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, फसव्या जाहिराती, दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ तसेच अवैध गुटखा साठ्यांविरोधात सुरू केलेल्या कारवाईमुळे ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

या पार्श्वभूमीवर परळीतील सामाजिक कार्यकर्ते उत्तमदादा माने यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीचे स्वागत करत त्यांना जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोर आणि गैरव्यवहार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

उत्तमदादा माने म्हणाले की, तुकाराम मुंढे हे



प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि जनहिताला प्राधान्य देणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून त्यांनी सुरू केलेली मोहीम ही सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भेसळमुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी अशा अधिकाऱ्यांना समाजातील सर्व घटकांनी पाठबळ दिले पाहिजे.

राज्यात विविध ठिकाणी भेसळयुक्त खवा, तूप, दुग्धजन्य पदार्थ, बनावट औषधे आणि अवैध गुटखा जप्त करण्याच्या कारवायांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, या मोहिमेची व्याप्ती आणखी वाढविण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना आणि तुकाराम मुंडे यांच्या समर्थकांना सोबत घेऊन प्रशासनाकडे अशा अधिकाऱ्याची या नियुक्तीवरून आता कुठेच बदली न करता त्यांना पाठबळ देण्याची करणार मागणी

तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासन विभागाने सुरू केलेल्या या कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये धाक निर्माण झाला असून, ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी ही मोहीम प्रभावी ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## शिक्षण विभागाचा मोठा निर्णय!

### विदर्भातील शाळा २२ जूनपासून सुरू होणार ; उर्वरित महाराष्ट्रात १५ जूनपासूनच घंटा वाजणार

■ पुणे वृत्तसंस्था

**राज्यात नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास अवघा एक आठवडा शिल्लक असताना, शिक्षण विभागाने शाळा सुरू करण्याच्या वेळापत्रकात अचानक मोठा बदल केला आहे. कडक उन्हाळा आणि तीव्र उष्णतेची लाट लक्षात घेता, केवळ विदर्भातील शाळा आता २२ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील सर्व शाळा नेहमीप्रमाणे येत्या १५ जूनपासूनच सुरू होणार आहेत.**

### तीव्र उष्णतेमुळे विदर्भासाठी विशेष निर्णय

■ विदर्भातील सध्याचे तापमान पाहता विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, यासाठी हा दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार, विदर्भातील राज्य मंडळाच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा २२ जून रोजी उघडतील.

### सुरुवातीचे काही दिवस सकाळच्या सत्रात शाळा




■ विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास होऊ नये म्हणून २२ ते ३० जून या कालावधीत विदर्भातील सर्व शाळा केवळ सकाळच्या सत्रात भरवल्या जातील. त्यानंतर, १ जुलैपासून या शाळा नियमित वेळेत सुरू होतील. विदर्भ वगळता राज्यातील इतर सर्व भागांतील शाळा मात्र १५ जूनपासूनच त्यांच्या नियमित वेळेत सुरू केल्या जातील. या बदलाची सर्व शाळा, शिक्षक, पालक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संयुक्त परिपत्रकाद्वारे केले आहे. याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना आवश्यक त्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

## मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना!; प्रशासकीय गती वाढवण्यासाठी १२ नवीन विभागांची निर्मिती एकूण संख्या ४५ वर


■ मुंबई वृत्तसंस्था

राज्यातील प्रशासकीय कामकाजाला वेग देण्यासाठी आणि सुसूत्रता आणण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मंत्रालयातील विविध विभागांची पुनर्रचना करण्याचा ऐतिहासिक निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'व्यवसाय सुलभता' संकल्पनेला बळ देण्यासाठी हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून, यामुळे आता मंत्रालयातील एकूण प्रशासकीय विभागांची संख्या ३३ वरून थेट ४५ होणार आहे.

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, एकाच छताखाली असलेल्या मोठ्या विभागांचे विभाजन करून नवीन स्वतंत्र विभाग तयार करण्यात आले आहेत: कृषि आणि पदुम: कृषि व पदुम विभागाचे विभाजन करून आता 'कृषि विभाग' आणि 'पदुम विभाग' असे दोन स्वतंत्र विभाग अस्तित्वात येतील.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग: या मोठ्या विभागाचे तीन तुकडे करून 'सहकार विभाग', 'पणन विभाग' आणि 'वस्त्रोद्योग विभाग' अशी स्वतंत्र व्यवस्था केली जाईल. महसूल व वन विभाग: या विभागातून तीन स्वतंत्र विभाग तयार केले आहेत - 'महसूल विभाग', 'मदत व पुनर्वसन विभाग' आणि 'वन विभाग'.

सामान्य प्रशासन व गृह विभाग: सामान्य प्रशासनातून स्वतंत्र 'राजशिष्टाचार विभाग' तर गृह विभागातून स्वतंत्र 'परिवहन विभाग' वेगळा करण्यात आला आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार: याचे विभाजन करून 'उद्योग व खनिकर्म विभाग', 'ऊर्जा विभाग' आणि 'कामगार विभाग' असे तीन नवीन स्वतंत्र विभाग बनवले आहेत. शिक्षण, क्रीडा आणि वैद्यकीय: 'शालेय शिक्षण व क्रीडा' विभागाचे विभाजन करून शिक्षण आणि क्रीडा हे दोन स्वतंत्र विभाग केले आहेत. तर 'पर्यटन व सांस्कृतिक' कार्य विभागातून 'सांस्कृतिक कार्य' आणि 'पर्यटन' हे दोन स्वतंत्र विभाग असतील. तसेच 'वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये' विभागाचे विभाजन करून स्वतंत्र 'अन्न व औषध प्रशासन' विभाग कार्यरत होईल.



### अधिकार स्वतंत्र, मात्र नवीन पदनिर्मिती नाही!

या पुनर्रचनेमुळे प्रत्येक नवीन विभागासाठी स्वतंत्र आस्थापना, रोख शाखा आणि नोंदणी शाखा अशी स्वतंत्र व्यवस्था केली जाईल. यामुळे कामकाजाची कार्यक्षमता वाढेल. विशेष म्हणजे, ही पुनर्रचना करताना सरकारवर कोणताही अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही, कारण यासाठी कोणतीही नवीन पदनिर्मिती केली जाणार नाही.

## मान्सूनच्या प्रगतीला ब्रेक; महाराष्ट्रात पावसासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा



### हवामान विभागाचा अंदाज : राज्यातील बहुतांश भागात पुढील चार ते पाच दिवस हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता

■ मुंबई : वृत्तसंस्था

राज्यातील शेतकरी आणि नागरिकांना प्रतीक्षेत ठेवणाऱ्या मान्सूनच्या प्रगतीचा वेग सध्या मंदावला आहे. देशाच्या काही भागांमध्ये मान्सून सक्रिय असला तरी महाराष्ट्रात त्याची पुढील वाटचाल अद्याप संथ असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, राज्यात मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल असून येत्या चार ते पाच दिवसांत काही भागांत पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि घाटमाथ्यावरील परिसरात अधूनमधून पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, मुंबईसह उपनगरांमध्ये मंगळवारी दिवसभर उष्ण व दमट वातावरण जाणवत होते. संध्याकाळच्या सुमारास काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी पडल्या. मात्र, या पावसामुळे उकाड्यात फारसा दिलासा मिळालेला नाही. दिवसाबरोबरच रात्रीही नागरिकांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे. बुधवारी मुंबई, ठाणे आणि परिसरातील काही भागांत हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर पालघर, रायगड आणि कोकण किनारपट्टीवरील काही भागांत ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी सुरू राहण्याची शक्यता आहे.

अरबी समुद्रातील वातावरणीय स्थितीत हळूहळू सुधारणा होत असून त्यामुळे मान्सूनच्या पुढील वाटचालीस पोषक परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे राज्यातील विविध भागांमध्ये लवकरच पावसाचा जोर वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. २८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे. राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी याही गोष्टीचा विचार उघड वक्तव्य करण्याआधी करायला हवा. अर्थात याविषयी आता कोणी उघड कबुली देण्याचा किंवा दुजोरा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्या अपघाताने सर्व समीकरणंच बदलून गेली आहेत. एकत्रिकरणाचा विचार करणारे आपापला विचार करताहेत; पण हे एकत्रिकरण ज्या राजकीय चित्राचा भाग होतं, त्या चित्रातल्या अनेक घटकांची आताच्या घडीची गरज, सोय काय आहे, याचा विचार कोणी करतं आहे, असं दिसत नाही. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली भेटीतही या विषयावर चर्चा झाल्याचं काही ठिकाणी प्रसिद्ध झालं आहे. त्याचे तपशील एक - दोन दिवसात कळतील. जर चर्चा झालीच असेल, तर बदललेल्या परिस्थितीत भाजपची भूमिका काय आहे, त्यांचा कल कुठे आहे, हे तिथे उपस्थित असलेल्यांना कळलंच असेल. राष्ट्रवादीतले प्रमुख चार-पाच नेते या एकत्रिकरणाला जो विरोध करताहेत, त्याची दखल भाजप कशी घेणार आहे, यावरच या 'चर्चेतल्या एकत्रिकरणा'चं भवितव्य अवलंबून आहे. अजितदादा या एकत्रिकरणाला तयार होते, त्यामागे राजकीय कारणांपेक्षा भावनिक कारणं जास्त होती, असं म्हणतात. ती भावनिक कारणं त्यांच्या वारसांच्या दृष्टीने किती महत्त्वाची ठरतात, हा मुद्दा आहेच. शिवाय, ही प्रक्रिया नेटाने पुढे नेण्याएवढी तीव्र इच्छाशक्ती आता कुणाकडे असण्याचं कारण नाही, ही वस्तुस्थितीही लक्षात घ्यावी लागेल. आधी कुटुंब; मग पक्ष याच क्रमाने ही दुरुस्ती व्हायची तेव्हां होईल.

# लोकमानस

### मुलखावेगळी माणस

पुण्यातील सिल्कीवर्ल्डमध्ये दुर्मिळ वस्तूचा संग्रह

आधुनिकतेच्या वेगाने धावणाऱ्या पुणे शहरात इतिहास आणि संस्कृतीची जपणूक करणारी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी कॅम्प परिसरातील सिल्कीवर्ल्ड अँटिक्स हे जुन्या आणि दुर्मिळ वस्तूंचे अनोखे दालन नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. या ठिकाणी प्रवेश करताच जणू एखाद्या टाईम मशीनमधून भूतकाळात गेल्याचा अनुभव येतो. शेकडो वर्षांचा इतिहास जपणाऱ्या वस्तू, दुर्मिळ कलाकृती आणि संग्रहणीय वस्तूंचा अनमोल खजिना येथे पाहायला मिळतो.

सिल्कीवर्ल्ड अँटिक्सचे संस्थापक समशीर खान यांनी हा व्यवसाय कोणत्याही पारंपरिक वारशातून नव्हे, तर स्वतःच्या आवडी आणि जिद्दीच्या जोरावर उभारला आहे. हिंजवडीतील आयटी क्षेत्रात काम करत असताना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा त्यांच्या मनात होती. त्यातून त्यांनी सुरुवातीला हँडीक्राफ्ट आणि एक्सपोर्ट व्यवसाय सुरू केला. त्याच काळात जुन्या वस्तूंबद्दल आकर्षण निर्माण झाले आणि त्यातून अँटिक वस्तूंच्या जगात प्रवेश झाला.अँटिक वस्तू म्हणजे केवळ जुन्या वस्तू नव्हेत, तर त्या इतिहासाच्या साक्षीदार असतात. प्रत्येक वस्तूमागे एक कथा दडलेली असते. सुरुवातीला या क्षेत्रातील अनेक गोष्टी शिकाव्या लागल्या. पुस्तके वाचून, अभ्यास करून आणि अनुभवी लोकांशी संवाद साधून माहिती मिळवली. आज या क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करण्यात यश आले आहे, असे समशीर खान सांगतात.सध्या या दालनात 10 हजारांहून अधिक विविध प्रकारच्या अँटिक वस्तूंचा संग्रह आहे. यामध्ये 100 ते 200 वर्षांपेक्षा अधिक जुन्या वस्तूंचा समावेश आहे. या संग्रहात 18 व्या शतकातील डंबेल्स, दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील टाईपरायटर, 1928 सालातील प्रसिद्ध चित्रकार नारायण वीरकर यांची दुर्मिळ चित्रे, जुनी नाणी, नोटा, बॅज, खेळणी, लाईटर्स आणि विविध देशांतील संग्रहणीय वस्तूंचा समावेश आहे. काही वस्तूंची किंमत 100 रुपयांपासून सुरू होत असून काही अत्यंत दुर्मिळ वस्तूंची किंमत तब्बल 50 लाख रुपयांपर्यंत आहे. याशिवाय जुन्या काळातील ट्रे, भिंतीवरील घड्याळे, रेडिओ, पारंपरिक भांडी, दुर्बिणी, पितळेच्या मूर्ती, जुने कॅमेरे, अँटिक परफ्युम बाटल्या, अंगठ्या, शोपीस, बाहुल्या आणि राजघराण्यांच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या अनेक वस्तू येथे उपलब्ध आहेत. या वस्तूंचा शोध घेण्यासाठी आणि खरेदीसाठी देश-विदेशातील संग्राहक, इतिहासप्रेमी आणि पर्यटक येथे भेट देतात.विशेष म्हणजे जगभरातील अँटिक वस्तूंचे संग्राहक आणि पर्यटक या ठिकाणी आवर्जून भेट देतात.






### क्रीडांगण : उच्चस्तरीय क्रिकेट प्रशिक्षणासाठी कबुनीचा जागतिक AI प्लॅटफॉर्म

AI-संचालित जागतिक क्रीडा प्लॅटफॉर्म कबुनीने आपल्या पहिल्या Playtime 2026 कार्यक्रमात अधिकृतपणे पदार्पण केले असून, सर्व स्तरांवरील क्रिकेटप्रेमींसाठी सहज उपलब्ध आणि उच्चस्तरीय प्रशिक्षणाच्या नव्या युगाची सुरुवात केली आहे.क्रीडा, तंत्रज्ञान आणि खेळ यांच्या संगमावर उभ्या असलेल्या कबुनीने प्रशिक्षणासाठी जगातील पहिल्यांदाच वापरल्या जाणाऱ्या अभिनव दृष्टिकोनाची ओळख करून दिली आहे. प्रगत AI तंत्रज्ञानाच्या मदतीने हे प्लॅटफॉर्म रिअल-टाइम आणि वैयक्तिकृत प्रशिक्षण प्रदान करते, ज्यामुळे सर्व स्तरांवरील खेळाडूंना कधीही आणि कुठेही आपल्या कामगिरीत सुधारणा करता येते.

या जागतिक लॉन्चसोबतच कबुनीने आपल्या सुपर कोचेसची घोषणा केली आहे. यामध्ये दिग्गज क्रिकेटपटू सौरव गांगुली, शेन वॉटसन, एबी डिव्हिलियर्स आणि श्रेयस अय्यर यांचा समावेश आहे. हे सर्व दिग्गज खेळाडू परस्परसंवादी आव्हाने आणि युवा स्पर्धांच्या माध्यमातून पुढील पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देण्यात आणि त्यांचा विकास घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. या प्लॅटफॉर्मच्या केंद्रस्थानी एक साधे पण प्रभावी ध्येय आहे प्रत्येक खेळाडूच्या खिशात जागतिक दर्जाचा क्रिकेट प्रशिक्षक उपलब्ध करून देणे. उच्च दर्जाच्या प्रशिक्षणाची उपलब्धता सर्वांसाठी खुली करून, जगभरातील खेळाडू शिकण्याची आणि प्रगती करण्याची पद्धत बदलण्याचा कबुनीचा प्रयत्न आहे.




### असा लगला शोध : साबण

साबणाचा शोध अचानक आणि योगायोगाने लागला. सुमारे ४८०० वर्षांपूर्वी (इ.स.पूर्व २८०० च्या सुमारास) मेसोपोटेमियामध्ये बळी दिलेल्या प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख एकत्र आल्याने जमिनीत साबणासारखा चिकट पदार्थ तयार झाला होता, ज्याचा वापर कपडे धुण्यासाठी केला जाऊ लागला इ.स.पूर्व २८०० च्या सुमारास, मेसोपोटेमियातील (सध्याचा इराक) लोक प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख एकत्र करून उकळत असत। या प्रक्रियेतून चरबी आणि राख मिळून एक घट्ट, फेस येणारा पदार्थ तयार झाला, ज्याचा उपयोग प्रामुख्याने कपडे आणि लोकर स्वच्छ करण्यासाठी केला गेला। साबणाच्या शोधाबद्दल प्राचीन रोममध्ये एक खूप प्रसिद्ध कथा आहे. रोमजवळ एक 'सॅपो' नावाचा डोंगर होता। तिथे लोक बळी दिलेल्या प्राण्यांची चरबी जाळत असत। पावसाच्या पाण्यामुळे ही जळालेली चरबी, राख आणि डोंगराची माती एकत्र होऊन टायबर नदीत मिसळली। नदीच्या काठावर कपडे धुणाऱ्या स्त्रियांच्या लक्षात आले की, या पाण्यामुळे त्यांचे कपडे कमी श्रमात आणि जास्त स्वच्छ होत आहेत। याच 'सॅपो' डोंगराच्या नावावरून साबणाला इंग्रजीत 'Soap' असे नाव पडले। एकोणिसाव्या शतकापर्यंत साबण बनवण्याची पद्धत बऱ्यापैकी सुधारली होती. १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला, आधुनिक रासायनिक प्रक्रियेचा वापर करून फेस येणारे, सुगंधी आणि त्वचेसाठी सुरक्षित साबण कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बनवले जाऊ लागले.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# तोहीद पठाण यांच्या कुटुंबीयांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून सांत्वनपर भेट

**परळी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तोहीद पठाण यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करण्यात आले. यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, पक्षाचे ज्येष्ठ नेते जीवनराव देशमुख, नगरपरिषद गटनेते नितीन बागवाले, नगरसेवक कादर कुरेशी, श्रीनिवास राऊत, बाबा शेख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




उपस्थित मान्यवरांनी तोहीद पठाण यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त केल्या. तसेच या दुःखद प्रसंगात कुटुंबीयांनी खंबीर राहावे, अशी भावना व्यक्त करत पक्ष त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला. या सांत्वनपर भेटीदरम्यान परिसरातील नागरिकांनीही उपस्थित राहून तोहीद पठाण यांना श्रद्धांजली अर्पण केली. या भेटीमुळे कुटुंबीयांना मानसिक आधार मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

### टीसी हरवली आहे

नाव : ऋषिकेश दिनकर चाटे
वय : २५ वर्षे
मोबाईल क्रमांक : ८३५६०३३७३१
पत्ता : शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड
इयत्ता : १० वी
परळी वैजनाथ ते बीड येताना माझी बॅग हरवली. त्या बॅगेमध्ये शाळेचा एल.सी. (Leaving Certificate), उत्पन्न प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती होत्या."




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आष्टी ग्रामीण रुग्णालयाची आयुष विभागाच्या जिल्हास्तरीय पथकाकडून पाहणी; आरोग्य सेवा व कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत कर्मचाऱ्यांचे कौतुक

**आष्टी | प्रतिनिधी**

येथील ग्रामीण रुग्णालयाला आयुष विभागाच्या जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनी नुकतीच भेट देऊन रुग्णालयाच्या विविध विभागांची सखोल पाहणी केली. या भेटीदरम्यान रुग्णालयातील आरोग्य सेवा, प्रयोगशाळेची कार्यपद्धती, औषधसाठा, उपचार सुविधा तसेच स्वच्छता आणि बाह्य परिसराची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पाहणीनंतर रुग्णालयातील सुविधा व एकूणच कामकाजाबाबत तीव्र समाधान व्यक्त करत संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी येथील वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. या महत्वपूर्ण पाहणी दौऱ्याच्या वेळी ग्रामीण रुग्णालय आष्टीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोराळे, डॉ. गुट्टे, डॉ. जावळे यांच्यासह आयुष विभागाचे विविध उच्चाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने बीड जिल्ह्याच्या जिल्हा आयुष व्यवस्थापक मा. डॉ. आकांक्षा शिंदे, सहाय्यक जिल्हा आयुष अधिकारी मा. जे. आनंद कुलकर्णी, जिल्हा आयुष सल्लागार मा. अजयकुमार राख, ग्रामीण रुग्णालय आष्टीचे आयुष वैद्यकीय अधिकारी मा. डॉ. संतोष विश्वनाथ गावडे तसेच योग व निसर्गोपचार विभागाचे श्री. आनंदकुमार यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

यावेळी आयुष विभागामार्फत ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची विस्तृत माहिती देण्यात आली. विशेषतः महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मोठा आर्थिक आधार मिळावा यासाठी राबविण्यात येणाऱ्या आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनांमुळे लाखो रुग्णांना मोठा दिलासा मिळत असल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनी आवर्जून नमूद केले. पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या या कल्याणकारी योजनांमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना एक प्रकारे नवजीवन मिळत आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या गरीब रुग्णांसाठी या योजना खऱ्या अर्थाने वरदान ठरत असून शासनाच्या आरोग्यविषयक धोरणांची आष्टी परिसरात प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे चित्र या निमित्ताने दिसून येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच आयुष विभागाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आज राज्यभर आरोग्य सुविधांचा विस्तार होत असून ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

आष्टी ग्रामीण रुग्णालयाने अल्प मनुष्यबळ आणि उपलब्ध संसाधनांच्या मर्यादित आधारे देखील रुग्णांना दर्जेदार सेवा देण्याचा आपला अविरत प्रयत्न सुरू ठेवला आहे. रुग्णालयातील उत्तम स्वच्छता, औषधांची वेळेवर उपलब्धता, प्रयोगशाळेचे चोख कार्य आणि रुग्णसेवेतील तत्परता पाहून आयुष विभागाच्या पथकाने समाधान व्यक्त केले.



ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी शासन, आरोग्य विभाग आणि आयुष विभाग यांच्यातील समन्वय आता अधिक प्रभावी होत असल्याचे या महत्वपूर्ण भेटीतून अधोरेखित झाले आहे. या प्रसंगी आष्टी येथील योग प्रशिक्षक गणेश उर्फ पप्पू वाल्हेकर, रुग्ण कल्याण समितीचे जिल्हास्तरीय सदस्य जालिंदर पोकळे, पत्रकार शरद रेडेकर, सेवानिवृत्त प्राध्यापक भा. दे. जगताप, आष्टी ग्रामीण रुग्णालयातील प्रयोगशाळा व्यवस्थापक गलांडे आबा, जयचंद निलावड, एक्स-रे विभागाचे तोडे, यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील इतर सर्व कर्मचारी वर्ग व परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आष्टी तालुक्यात दूध संकलन केंद्रांवर अन्न व औषध प्रशासनाचे छापे; दोन ठिकाणचे नमुने प्रयोगशाळेकडे रवाना

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुधामध्ये भेसळ होत असल्याची चर्चा सुरू असतानाच, अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. दिनांक ८ जून रोजी आष्टी तालुक्यातील तवलवाडी आणि मंगरूळ या दोन ठिकाणच्या दूध संकलन केंद्रांवर अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने अचानक भेटी देऊन दुधाचे नमुने (सॅम्पल) ताब्यात घेतले आहेत. हे सर्व नमुने पुढील विश्लेषणासाठी संभाजीनगर येथील विभागीय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले असून, येत्या पंधरा दिवसांत या नमुन्यांचा अहवाल येणे अपेक्षित आहे. हा प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील कडक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाडे यांनी दिली आहे.

FDA MAHARASHTRA

मागील काही वर्षांमध्ये तालुक्यात दुग्ध भेसळीची अनेक प्रकरणे उघडकीस आली होती; मात्र पुढे त्या प्रकरणांचे काय झाले, याचा कोणालाही थांगपत्ता लागला नव्हता. परंतु, अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती झाल्यापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अन्नभेसळ आणि नियमबाह्य औषध विक्री करणाऱ्यांवर धडक छापे टाकण्याचे सत्र सुरू झाले आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आष्टी तालुक्यात ही धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान पारदर्शकता राहावी आणि कोणताही घोळ होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या या पथकामध्ये दुग्धविकास अधिकारी कार्यालयाचे अधिकारी, पोलीस कॉन्स्टेबल आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांचा प्रामुख्याने समावेश होता. संकलन केंद्रांवरून दुधाचे नमुने घेतल्यानंतर ते अत्यंत विशिष्ट पद्धतीने पॅक करून सीलबंद करण्यात आले आहेत, त्यामुळे प्रक्रियेत कोणतीही गडबड होण्यास वाव नसल्याचे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. आता संभाजीनगरच्या प्रयोगशाळेतून काय अहवाल येतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून त्यानुसार पुढील कायदेशीर पावले उचलली जाणार आहेत.

# तोहीद खान खून प्रकरणातील आरोपींना कायद्याचा धाक उरला नाही का ?

## आरोपींच्या चेहऱ्यावर 'निर्लज्ज हास्य' AIMIM चे शेख मोहसीन यांचा संताप

परळी | प्रतिनिधी

तोहीद खान खून प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी तपासासाठी घटनास्थळ पाहणीसाठी नेले असता, त्यांच्या चेहऱ्यावर भीतीऐवजी हास्य दिसल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकारामुळे परळीत संतापाची लाट उसळली असून नागरिकांकडून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना AIMIM नेते शेख मोहसीन यांनी आरोपींना कायद्याचा धाक उरला नाही का, असा सवाल उपस्थित केला. "एका गंभीर हत्येच्या प्रकरणातील आरोपी तपासादरम्यान चक्क हसत असतील, तर त्यांना कोणाचे अभय आहे का?" असा प्रश्न त्यांनी प्रशासनाला विचारला.

आरोपींच्या या वर्तनामुळे मृत तोहीद खान यांच्या कुटुंबीयांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, आरोपींवर कठोर कारवाई करून जनतेचा कायद्यावरील विश्वास कायम ठेवावा, अशी मागणी शेख मोहसीन यांनी केली आहे.



## 24 वर्षे देशसेवा बजावत हवालदार पदावरून निवृत्त

# सावखेड तेजनच्या गजानन अचलखांब यांचा गौरवशाली प्रवास

## देशाच्या विविध सीमावर्ती व संवेदनशील भागात बजावली उल्लेखनीय सेवा; युवकांसाठी ठरले प्रेरणास्थान

सावखेड तेजन/प्रतिनिधी

राष्ट्रसेवा हीच सर्वोच्च सेवा मानत तब्बल २४ वर्षे भारतीय सैन्यात कर्तव्य बजावणारे सावखेड तेजन येथील सुपुत्र गजानन संतुबा अचलखांब हवालदार पदावरून सन्मानाने निवृत्त झाले आहेत. त्यांच्या प्रदीर्घ आणि गौरवशाली लष्करी कारकिर्दीमुळे गावासह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २७ मे २००२ रोजी जबलपूर येथील प्रशिक्षण केंद्रातून भारतीय सैन्यात दाखल झालेल्या गजानन अचलखांब यांनी सेवाकाळात देशाच्या विविध भागांमध्ये अत्यंत जबाबदारीची कर्तव्ये पार पाडली. सैन्याच्या सिग्नल विभागात कार्यरत असताना त्यांनी अनेक महत्त्वाच्या ठिकाणी सेवा देत देशाच्या संरक्षण व्यवस्थेला बळकटी देण्याचे कार्य केले.

त्यांच्या सेवाकाळात उदयपूर येथील 2-14 एफआयडी उपगट, 3-55 सिग्नल कंपनी, 3-21 राष्ट्रीय रायफल्स, अहमदाबाद येथील 4-11 डिव्हिजन सिग्नल रेजिमेंट, नागालँडमधील 5-3 कॉर्प्स, मथुरा येथील 1 कॉर्प्स, रांची येथील 23 इन्फंट्री डिव्हिजन सिग्नल रेजिमेंट, त्रिगाम येथील 68 माउंटन ब्रिगेड सिग्नल रेजिमेंट, लखनौ येथील सेंट्रल कमांड सिग्नल रेजिमेंट तसेच जबलपूर येथील 21 माउंटन डिव्हिजन सिग्नल रेजिमेंटमध्ये त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

देशाच्या विविध सीमावर्ती, दुर्गम आणि संवेदनशील भागात कार्यरत राहताना त्यांनी सैन्यदलाच्या शिस्त, पराक्रम आणि समर्पणाची परंपरा जपली. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रभक्तीच्या जोरावर त्यांनी आपल्या सेवेत उत्कृष्ट कामगिरी बजावत हवालदार पदापर्यंत मजल मारली.

गजानन अचलखांब यांची कारकीर्द आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून सैन्य सेवेत करिअर घडविण्याची इच्छा बाळगणाऱ्या तरुणांना त्यांच्या कार्यातून नवी दिशा मिळत आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम केल्यास यश निश्चित मिळते, याचे ते जिवंत उदाहरण ठरले आहेत.



निवृत्तीनंतरही समाजसेवा, राष्ट्रप्रेम आणि युवकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य करण्याचा त्यांचा मानस असून त्यांच्या भावी आयुष्यासाठी ग्रामस्थ, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सावखेड तेजन गावाच्या इतिहासात अभिमानाने नोंद व्हावी अशी त्यांची ही देशसेवेची वाटचाल मानली जात आहे.

# नव्वदच्या दशकातील परळीतील स्टार क्रिकेट खेळाडुंचे गेट टुगेदर संपन्न

## रंगतदार सामना व स्नेह भोजनाचा घेतला आस्वाद



परळी | प्रतिनिधी

90 च्या दशकातील परळी शहरातील स्टार क्रिकेट खेळाडूंचे गेट-टुगेदर नुकतेच संपन्न झाले. शहरातील या खेळाडूंनी परत एकदा नव्या उत्साहाने क्रिकेटच्या मैदानावर उतरून एक रंगतदार सामना खेळला व जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला. क्रिकेट सामन्यानंतर क्रिकेट खेळाडू डिंपी भाटिया यांनी सर्व मित्रांसाठी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचाही सर्वांनी आस्वाद घेतला.

एकेकाळी क्रिकेटच्या मैदानावर तारुण्यात असताना अष्टपैलू कामगिरी करणारे परळी शहरातील 30 ते 40 खेळाडू सुमारे 20 ते 25 वर्षांनी पुन्हा एकदा एकत्र आले. डिंपी भाटिया ,नगरसेवक व उत्कृष्ट क्रिकेट खेळाडू म्हणून ज्यांची ख्याती होती असे निळकंठ चाटे तसेच क्रीडाशिक्षक अजय जोशी व प्रसिद्ध पत्रकार व लेखक तसेच क्रिकेट खेळाडू म्हणून प्रसिद्ध असलेले रानबा गायकवाड यांनी एकत्र येऊन शहरातील सर्व जुन्या क्रिकेट खेळाडूंना एकत्रित आणले. त्या सर्व क्रिकेट खेळाडूंचा एक व्हाट्सअप ग्रुप तयार करून सर्व मित्रांना गेट-टुगेदर साठी निमंत्रण देण्यात आले.

7 जून रोजी या सर्व माजी क्रिकेटपटू असलेल्या मित्रांनी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या बाजीराव क्रिकेट मैदानावर एक 12 षटकांचा रंगतदार सामना खेळला. यामध्ये निळकंठ चाटे व साजिद शेख यांच्या संघात खेळाडूंची विभागणी करून बारा षटकांचा सामना झाला. अनेकांनी पन्नाशी पार केलेली असल्यामुळे मैदानावरही अनेक गमती जमती पाहायला मिळाल्या. तरी सर्वांनी उत्साहाने मैदानावर क्रिकेटचा आनंद लुटला. हा सामना साजिद यांच्या संघाने जिंकला परंतु जिंकल्याचा आनंद दोन्ही संघांनी तितक्याच उत्साहाने साजरा केला. जे खेळाडू मैदानात उतरले होते त्यापैकी अनेकांनी विद्यापीठ संघात तसेच जिल्हा आणि विभागीय संघात प्रतिनिधित्व केलेले होते.

या खेळाडूमध्ये नगरसेवक निळकंठ चाटे, रानबा गायकवाड, अजय जोशी, साजिद शेख, सचिन सूर्यवंशी,बालाजी वाघ, अनिल जठार, नरसिंग देशमुख, महेंद्र ठाकूर, श्याम काकडे, मसरत शेख, वाजिद शेख, संजय देवधर, चंद्रकांत शिंदे, सचिन जोशी, संजय वानखेडे, सचिन ठाकूर, चंद्रकांत वाघमारे , पापा सिंग भाटिया, पापासिह ठाकूर, बबलू रोडगे, अनिल जाधव, विकी अवस्थी, गणेश केंद्रे, क्षणिक गीते, मकरंद नरवणे यांच्यासह 25 ते 30 खेळाडू सहभागी झाले होते. सर्व खेळाडूंच्या पांढऱ्या टी-शर्टची व्यवस्था निळकंठ चाटे यांनी केली होती. क्रिकेट सामना संपल्यानंतर डिंपी भाटिया यांनी सर्व खेळाडूंसाठी संगम येथील त्यांच्या शेतातील फार्म हाऊसवर स्नेहभोजन दिले. या भोजनाचा सर्व खेळाडूंनी आस्वाद घेतला. शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यसनापासून दूर राहावे आणि सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचा असल्याचे या गेट-टुगेदर च्या माध्यमातून खेळाडूंनी नव्या पिढीच्या तरुणांना दिला आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
• बीड, बुधवार, 10 जून 2026



## आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याने
# गावांच्या वीजपुरवठ्यात होणार सुधारणा
### शेतकऱ्यांना मोठा दिलासा ; आ .सुरेश धस यांचे मानले आभार

आष्टी (प्रतिनिधी)



आष्टी तालुक्यातील वाळुंज, टाकळशिंग, सांगवी आष्टी, खडकत, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी, तवलवाडी तसेच एक्सप्रेस फीडरचा समावेश यापूर्वी एकाच ५ एमव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरवर होता. त्यामुळे वाढलेल्या वीजभारामुळे वारंवार फ्युज उडणे, लाईट ट्रिप होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच दिवसा शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा न मिळणे अशा समस्यांना शेतकरी व ग्रामस्थांना सामोरे जावे लागत होते.

या समस्येची गंभीर दखल घेत आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी महावितरणकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत आता सांगवी आष्टी व खडकत या गावांसाठी स्वतंत्र ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे.

या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे सांगवी आष्टी व खडकत या गावांचा वीजभार स्वतंत्र झाला असून पूर्वीच्या ट्रान्सफॉर्मरवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. परिणामी वाळुंज, टाकळशिंग, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी, तवलवाडी तसेच इतर गावांनाही अधिक स्थिर व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

वीजभाराचे योग्य विभाजन झाल्यामुळे वारंवार होणारे फॉल्ट, कमी दाबाची समस्या आणि लाईन ट्रिपिंगचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः कृषी पंपधारक शेतकऱ्यांना दिवसा अधिक सुरळीत वीज उपलब्ध होणार असल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होणार आहे.

या महत्त्वपूर्ण कामाबद्दल वाळुंज, टाकळशिंग, सांगवी आष्टी, खडकत, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी व तवलवाडी परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आमदार सुरेश धस यांचे आभार मानले असून, त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासूनची वीज समस्या मार्गी लागल्याची भावना व्यक्त केली आहे.

# बँकॉक येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत युवा शास्त्रज्ञ रणजित राऊत यांना उत्कृष्ट पर्यावरणीय शाश्वतता पुरस्कार-2026 प्रदान



आष्टी | प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील फक्राबादचे सुपुत्र तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित योगेश्वरी महाविद्यालय,अंबाजोगाई येथील प्राणीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी तथा युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांना बँकॉक, थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या १० व्या आंतरराष्ट्रीय “क्लाइमेट स्मार्ट नॅचरल रिसोर्सेस मॅनेजमेंट फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर ॲन्ड अलाइड सायन्सेस” (शाश्वत शेती आणि संलग्न विज्ञानासाठी हवामान-अनुकूल नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन) परिषदेदरम्यान “एक्सैलेंस इन एन्वार्नमेंटल सस्टेनॅबीलीटी अवॉर्ड-2026” (उत्कृष्ट पर्यावरणीय शाश्वतता पुरस्कार-२०२६) हा प्रतिष्ठित पुरस्कार डॉ. बिनय कुमार चक्रवर्ती, (ढाका, बांगलादेश), डॉ.रमेश राठोड (रायचूर, कर्नाटक), उपेंद्र सिंग (जयपूर, राजस्थान), अनंत कुमार,(अध्यक्ष,ए. टि.डि.एस. गाझियाबाद, उत्तर प्रदेश), डॉ. देवांशु गुप्ता (शास्त्रज्ञ,भारतीय प्राणी सर्वेक्षण,कोलकाता) यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान पुर्वक प्रदान करण्यात आला. ही परिषद ५ जून २०२६ रोजी आशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (ए.आय.टी.), बँकॉक, थायलंड येथे आयोजित करण्यात होती. ही आंतरराष्ट्रीय परिषद अन्न, कृषी आणि नैसर्गिक संसाधने विभाग, आशियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बँकॉक, बांगलादेश विद्यापीठ, ढाका, बांगलादेश, कृषी तंत्रज्ञान विकास संस्था (ए.टि.डी.एस.), गाझियाबाद, जी.के. वी.के. बेंगलोर, भारतीय प्राणी सर्वेक्षण कोलकाता, काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी, उत्तर प्रदेश, एस.के.एन. कृषी विद्यापीठ जोबनेर, राजस्थान, कै. रसिका महाविद्यालय देवनी, लातूर महाराष्ट्र तसेच भारत व विदेशातील विविध शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या १० व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन आशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (ए.आय. टी.), बँकॉक, थायलंड येथे ५ जून २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन करण्यात आले होते. जगभरातून थायलंड, बांगलादेश, नेपाळ,पाकिस्तान, श्रीलंका, भारत इत्यादी देशाच्या शास्त्रज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि पर्यावरण तज्ज्ञांच्या उपस्थितीत हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पर्यावरण संवर्धन, जैवविविधता संरक्षण, शाश्वत विकास, मानव वन्यजीव संघर्ष अभ्यास उपाय योजना तसेच समाजाभिमुख संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन रणजित राऊत यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. विविध देशांतील तज्ज्ञांच्या परीक्षणानंतर आणि शिफारशींनुसार त्यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

या परिषदेत रणजित राऊत यांनी पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापना संदर्भातील संशोधनात्मक विचार मांडले. त्यांच्या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर हा सन्मान प्रदान करण्यात आल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक, जैवविविधता, पर्यावरण संवर्धन, संरक्षण व संशोधन क्षेत्राचा गौरव झाला आहे.

हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर रणजित राऊत यांनी हा सन्मान आपल्या गुरुजन, संशोधन मार्गदर्शक, सहकारी आणि पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या सर्व घटकांना समर्पित असल्याचे सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

या उल्लेखनीय यशामुळे अहिल्यानगर, छत्रपती संभाजी संभाजीनगर, बीड व अंबाजोगाई सह मराठवाड्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# लातूर एमआयटीत बालरोग विभागाची प्रगत व मुलभूत जीवनरक्षण प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा

लातूर |प्रतिनिधी



लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोगशास्त्र विभागातर्फे भारतीय बालरोग संघटना (इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स) अंतर्गत तीन दिवसीय प्रगत जीवनरक्षण प्रणाली (ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट) आणि मुलभूत जीवनरक्षण प्रणाली (बेसिक लाईफ सपोर्ट) प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालय परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या सहकार्य व प्रोत्साहनातून वैद्यकीय महाविद्यालयातील सुसज्ज कौशल्य प्रयोगशाळा (स्किल लॅब) येथे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा आणि शैक्षणिक प्रकल्प संचालिका डॉ. सरिता मंत्री यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश भट्टड, लातूर आयएपीचे सचिव डॉ. किरण होळीकर व कोषाध्यक्ष डॉ. मंगेश डाके यांच्यासह बालरोग विभागातील विभाग प्रमुख, संबंधित सर्व डॉक्टर्स यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यशाळेत डॉ. भावेश शहा मिरज यांच्या नेतृत्वाखाली डॉ. दीपिका माशाळकर लातूर, डॉ. उदय राजपूत सातारा, डॉ. अमोल गिरवलकर कोल्हापूर, डॉ. नरेश सोनकावडे ठाणे, डॉ. राहुल डावरे पुणे, डॉ. विनोद इंगळे छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. संगीता चिवळे पुणे या राज्यभरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

लातूर एमआयटीच्या बालरोगशास्त्र विभाग प्रमुख तथा लातूर आयएपीच्या अध्यक्षा डॉ. विद्यादेवी कांदे यांच्या पुढाकारातून आणि डॉ. दीपिका माशळकर यांच्या संकल्पनेतून व समन्वयातून कार्यशाळेचा उपक्रम राबविण्यात आला. तर डॉ. शीतल भट्टड आणि डॉ. विशाखा पडिले यांनी स्थानिक पातळीवरील नियोजनात मोलाची मदत केली.

या तीन दिवसीय कार्यशाळेत आजारी बालकांमधील गंभीर लक्षणे ओळखणे, आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करणे तसेच तातडीच्या उपचारांची प्रात्यक्षिकांसह (हँड्स-ऑन) सखोल प्रशिक्षण देण्यात आले. मर्यादित जागा असलेल्या या कार्यशाळेत राज्यभरातून आलेल्या ३८ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता.

बालरोग क्षेत्रातील आपत्कालीन वैद्यकीय उपचारांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डॉक्टरांचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे संस्थेच्या व्यवस्थापनाचे, प्रशासनाचे आणि सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान असून, आयोजक समितीने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून आणि आयएपी सदस्यांकडून आयोजक समितीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.